# *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : ३९८/२०२१/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष पंढरीनाथ पगारे,<br>रा.सर्वे नं.१४०/१-२, घर नं.१७, माऊली सोसायटी,<br>चर्चच्या पाठीमागे, मालेगाव कॅम्प,<br>ता.मालेगाव, जि.नाशिक. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>मुख्याध्यापक,<br>झु.प.काकाणी विद्यालय, भुईकोट किल्ला,<br>मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक | : | प्रतिवादी |

**तक्रार सुनावणी दिनांक – ०४/०८/२०२२**

तक्रारदार यांनी दिनांक २३/०७/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक ०४/०८/२०२२ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

आयोगाने द्वितीय अपील क्रमांक ३३७८/२०१९/नाशिक वरील निर्णय दिनांक २३/०३/२०२१ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालय माध्यमिक विभाग, भुईकोट किल्ला, मालेगाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५/०४/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी."

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक २३/०७/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २५/०४/२०१९ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालय माध्यमिक विभाग, भुईकोट किल्ला, मालेगाव यांनी आयोगास दिनांक ०४/०७/२०२२ रोजी सादर केलेल्या अहवालात असे नमूद केले आहे की, आयोगाच्या आदेशानुसार तक्रारदार यांना दिनांक १६/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये १ ते ९६ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरविली आहे. त्याबाबत तक्रारदार यांना माहिती प्राप्त झाली बाबतची पोच आयोगास सादर केली आहे.

सुनावणीच्या वेळी म्हणणे मांडण्याची संधी दिली असता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालय माध्यमिक विभाग, भुईकोट किल्ला, मालेगाव यांनी सांगितले की, आयोगाचे

दिनांक २३/०३/२०२१ रोजीचे आदेश दिनांक ०५/०७/२०२१ रोजी प्राप्त झाले होते. त्यानुसार तक्रारदार यांना दिनांक १६/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये १ ते ९६ पृष्ठांची माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरविली आहे. तक्रारदार यांना माहिती प्राप्त झाली बाबतचे पोच आयोगास सादर करीत आहे.

तसेच तक्रारदार यांनी सुनावणीदरम्यान आयोगास असे स्पष्ट केले की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविली आहे. परंतु सदरची माहिती खोटी व दिशाभुल करणारी पुरविली आहे.

उपरोक्त सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक ३३७८/२०१९/नाशिक वरील दिनांक २३/०३/२०२१ रोजीच्या पारित आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना कार्यालयातील उपलब्ध माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरविल्याचे स्पष्ट होते. तथापि, सुनावणीदरम्यान तक्रारदार यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली आहे. प्रस्तुत प्रकरणी आयोगास सादर केलेले अभिलेख तसेच उपरोक्त बाबी विचारात घेता तक्रारदार यांनी त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविले असल्याबाबत आयोगास शपथपत्र सादर करणे. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास माहिती पुरविली असून सदर माहिती उपलब्ध कागदपत्रावरुन सत्य माहिती पुरविले असलेबाबत शपथपत्र आयोगास सादर करणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, काकाणी विद्यालय माध्यमिक विभाग, भुईकोट किल्ला, मालेगाव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आयोगाकडील द्वितीय अपील क्रमांक ३३७८/२०१९/नाशिक वरील दिनांक २३/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार तक्रारदारास दिनांक १६/०७/२०२१ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असून सदर माहिती उपलब्ध कागदपत्रावरुन सत्य माहिती पुरविले असलेबाबत शपथपत्र आयोगास सादर करावे.

२) तक्रारदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आयोगाडील द्वितीय अपील क्रमांक ३३७८/२०१९/नाशिक वरील दिनांक २३/०३/२०२१ रोजीच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६/०७/२०२१ च्या पत्रान्वये खोटी व दिशाभूल करणारी माहिती पुरविली असल्याबाबत आयोगास शपथपत्र सादर करावे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

२) श्री.तुकाराम गजमल मांडवडे (द्वितीय अपील सुनावणीवेळी कार्यरत जन माहिती अधिकारी) मुख्याध्यापक, झु.प.काकणी विद्यालय, भुईकोट किल्ला मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक.

---

क्र.रामाआ-नाशिक/तक्रार क्र.३९८/२०२१/नाशिक/ओ २०६४ दिनांक- १९/१०/२०२२